# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.

## प्रेसनोट

दिनांक २६/०२/२०२२

**“ सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने अवैधरित्या शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची मोठ्या प्रमाणात दुकानामध्ये साठवणुक करुन विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई केलेबाबत.”**

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सामाजिक सुरक्षा पथक हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक २५/०२/२०२२ रोजी निगडी पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची दुकानामध्ये मोठ्या प्रमाणात साठवणुक करुन विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक २५/०२/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी निगडी पोलीस स्टेशन हद्दीत इसम नामे अतुल छाजेड हा त्याचे दत्तवाडी, आकुर्डी, पुणे येथील अतुल एन्टरप्रायझेस नावाचे दुकानामध्ये गुटख्याची साठवणुक करुन त्याची दुकाची ॲक्टीव्हा तिचा आरटीओ नं एमएच १४ एफआर ००१७ हिचेवर गुटख्याची वाहतूक करुन त्याची निगडी परिसरात स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी विक्री करीत आहे. अशी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी निगडी पोलीस स्टेशन हद्दीत सकाळी ०९:५० वाजता सापळा रचुन छापा टाकला असता खालील मुद्देमाल आरोपीच्या ताब्यात मिळुन आला असुन त्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

१) १,१६,३८७/- रु किं चा प्रतिबंधीत तंबाखूजन्य गुटखा.
२) २६,०००/- रु किं ची दुचाकी जु.वा.किं.अं.

-----------------------------------

**असा एकुण १,४२,३८७/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे १) अतुल दिलीप छाजेड वय ३६ वर्षे रा. यमुनानगर, प्रभुकुंज सोसायटी, ५८/१२ निगडी, पुणे/ निरुपम सोसायटी नं-२, पहिला मजला, फ्लॅट नं १०१, आकुर्डी, पुणे **तसेच पाहिजे आरोपी नामे** २) आलम ऊर्फ सलमान पठाण पुर्ण नाव पत्ता माहित नाही यांचेविरुध्द निगडी पोलीस स्टेशन येथे गुरनं १२७/२०२२ भादंवि कलम ३२८, २७२, २७३, १८८, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास निगडी पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अप्पर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. काकासाहेब डोळे, मा. सहा. पोलीस आयुक्त डॉ. श्री. प्रशांत अमृतकर, पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. डॉ. अशोक डोंगरे, पोउपनि प्रदिपसिंग सिसोदे, पोउपनि श्री. धैर्यशिल सोळंके, पोलीस अंमलदार विजय कांबळे, किशोर पढेर, संतोष बर्गे, नितीन लोंढे, भगवंता मुठे, अमोल साडेकर, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, राजेश कोकाटे, वैष्णवी गावडे, योगेश तिडके, अमोल शिंदे, सुमित डमाळ, रेशमा झावरे, सुधा टोके यांनी केली आहे.



thor
Feb 25, 2022, 18:00